## नमुना क्रमांक ३

## लेखा परीक्षा अहवाल

### ( कृषि उत्पादन बाजार समिति )

१. **सर्वसाधारण—**

१) लेखा परीक्षा नोंदवहीप्रमाणे लेखा परीक्षा अहवालाचा अनुक्रमांक.

२) बाजार समितीचे नाव.

तालुका जिल्हा

३) बाजाराचे क्षेत्र

४) दुय्यम बाजाराची नावे.

५) शेती मालाचे नियमन करणाऱ्या शासकीय अधिसूचनेचा क्रमांक व दिनांक.

६) लेखा परीक्षा अधिकाऱ्याचे नाव

पदनाम

मुख्यालय

७) दिनांक : (अ) लेखा परीक्षा सुरू केल्याचा.

(ब) लेखा परीक्षा पूर्ण झाल्याचा.

(क) लेखा परीक्षा अहवाल सादर केल्याचा.

८) वेगवेगळ्या मतदार संघातील बाजार समितीच्या सदस्यांची यादी मिळवा आणि ती लेखा परीक्षा अहवालास जोडा.

२. **लेखा परीक्षा दोष दुरुस्ती—**

१) गेल्या लेखा परीक्षा अहवालात उल्लेखिलेल्या महत्त्वाच्या मुद्यांकडे दुर्लक्ष केले आहे काय ?

२) बाजार समितीने दोष दुरुस्ती अहवाल सादर केला आहे काय ? असल्यास, तो सादर केल्याचा क्रमांक आणि दिनांक लिहा.

३. **अनुज्ञप्ती (लायसेन्स)—**

१) अनुज्ञप्तीची नोंदवही योग्य रीतीने ठेवली असून ती अद्यावत लिहिली आहे काय ?

२) बाजार समितीच्या वेगवेगळ्या प्रकारच्या अनुज्ञप्ती धारकांची संख्या आणि त्यांच्याकडून वसूल केलेली शुल्के खालील नमुन्यात लिहा.

| अनु-क्रमांक | अनुज्ञप्ती धारकाचा वर्ग | संख्या | अनुज्ञप्ती शुल्काचा दर | मिळालेले एकूण शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |



। पदनाम

३ ) (अ) अनुज्ञप्ती धारकांकडून अनज्ञप्तीसाठी घेतलेले लेखी अर्ज आणि करारनामे बरोबर आहेत काय ?

(ब) बाजार समितीने ते योग्य रीतीने मंजूर केले आहेत काय ?

(क) आवश्यक तेथे अनुज्ञप्तीचे नवीनीकरण केले आहे काय ?

(ड) वर्षात एकादी अनुज्ञप्ती निलंबित ( सस्पेंड ) किंवा रद्द केली आहे काय ?

(ई) अशा निलंबित अथवा रद्द करण्याबाबत कायदा, कानू आणि पोटनियम यात घालून दिलेल्या पद्धतीचे योग्य रीतीने अनुपालन केले आहे काय ?

४. **तोलारी—**

१ ) तोलाऱ्याकडून ठेवी घेतल्या आहेत काय ?

२ ) प्रत्येक तोलाऱ्यासाठी अशा ठेवीची रक्कम पोटनियमात किती ठरविली आहे ?

३ ) सर्व तोलाऱ्यांना बिल्ले दिले आहेत काय ? बिल्ल्यांचा शिलकी माल तपासा.

५. **शेती मालावरील बाजार शुल्के—**

१ ) शेती मालावरील बाजार शुल्कांचे दर द्या.

२ ) वेगवेगळ्या मालाची एकूण आवक आणि वर्षात त्यावर गोळा झालेले एकूण शुल्क द्या.

३ ) पोटनियमात ठरवून दिलेल्या दराप्रमाणे सर्व आवकीवर शेती मालावरील बाजार शुल्क वसूल केले आहे काय याची खात्री करा.

४ ) शेती मालावरील बाजार शुल्क आवक नोंदवहीप्रमाणे वसूल केल्याचे शेती मालावरील बाजार शुल्काच्या नोंदवहीत दर्शविले आहे काय ?

६. **वांधे ( डिस्प्युटस )—**

१ ) वांधे नोंदवही पहा आणि वांधे निर्णयासाठी ठरवून देण्यात आलेली शुल्के वसूल झाल्याची खात्री करा.

२ ) निर्णित वांध्यांची एकूण संख्या आणि वर्षात वसूल झालेल्या शुल्काची एकूण रक्कम द्या.

३ ) (अ) वांधा निर्णय मंडळाची रचना योग्य रीतीने झाली आहे काय ?

(ब) त्यांनी मिटविलेल्या वांध्यांची संख्या लिहा.

## ७. बाजार समितीचे दैनंदिन कामकाज—

१) बाजार समितीने भावांच्या दैनंदिन याद्यांचे कागदपत्र ठेवले आहेत काय ?

२) कानू क्रमांक २४ आणि २५ च्या तरतूदीनुसार बाजारात वापरात असलेले तराजू, वजने आणि मापे यांची नियतकालिक तपासणी केली जाते काय ?

३) बाजार समितीने शेती मालातील भेसळ रोखण्यासाठी वर्षात काही कारवाई केली आहे काय ?

४) वर्षात भरलेल्या वेगवेगळ्या सभांची एकूण संख्या लिहा.

५) (अ) लेखा परीक्षेची आकारलेली मागील शुल्काची एकूण रक्कम द्या आणि ती कोणत्या कालावधी–साठी आकारली ते द्या.

(ब) लेखा परीक्षा शुल्क भरल्याच्या चलनाचा क्रमांक आणि दिनांक, भरलेली रक्कम आणि ज्या कोषा–गारात ती भरली त्याचे नाव लिहा.

(क) जर लेखा परीक्षा शुल्क थकीत असेल तर तपशील देवून न भरण्याची कारणे द्या.

६) (अ) शिल्लक मोजा आणि ज्या दिनांकास मोजली तो नमूद करून कीर्दीवर सही करा.

(ब) ज्या अधिकाऱ्याने मोजण्यासाठी शिल्लक दिली त्याचे नाव आणि पदनाम लिहा.

(क) आपल्याजवळ रोख शिल्लक ठेवण्यास ते प्राधिकृत आहेत काय ?

(ड) कीर्दीप्रमाणे ती बरोबर आहे काय ?

७) बँक पास पुस्तकात किंवा बँकेच्या पत्रकात आणि बँकेच्या शिलकेच्या प्रमाणपत्रात दाखविलेल्या बँक बाक्या लेखा पुस्तकात दाखविलेल्या अशा बाक्याशी जुळतात काय ? नसल्यास, मेळपत्रक तपासा.

८) (अ) रोखे आणि शिल्लक माल यांची प्रत्यक्ष रुजवात घ्या.

(ब) रोख्यावरील लाभांशाच्या आणि व्याजाच्या रकमा नियमितपणे गोळा केल्या जात आहेत काय ?

(क) रोखे जर बँकेकडे ठेवले असतील तर तशी प्रमाण–पत्रे मिळवून ती दप्तरात ठेवली आहेत काय ?

(ड) गुंतवणुक नोंदवही ठेवली असून ती अद्यावत लिहिली आहे काय ?

९) लेखा परीक्षा अहवाल पाठविण्यापूर्वी आपण त्याच्या मसूद्याची चर्चा बाजार समितीच्या बैठकीत केली आहे काय ?

१०) शेतीमाल विक्रीचे योग्य प्रकारे नियमन करण्यासाठी पुरेशी कारवाई करण्यात आली आहे काय ? आपले विचार सर्वसाधारण अभिप्रायात व्यक्त करा.

८. **कायदा, कानू आणि पोटनियम—**

१) बाजार समितीजवळ कायदा, कानू आणि तिच्या नोंद-लेल्या पोटनियमांची प्रत आहे काय ?

२) कायदा, कानू व पोटनियम यांचे उल्लंघन झाल्याच्या नोंदी द्या.

१) कायदा कलम क्रमांक

२) कानू क्रमांक.

३) पोटनियम क्रमांक.

३) पोटनियमानुसार काही नियम तयार केले आहेत काय ? योग्य त्या प्राधिकाऱ्याकडून ते सम्मत झाले आहेत काय ? त्यांचे योग्य रीतीने अनुपालन होत आहे काय ?

९. **जमीनी, इमारती आणि अन्य बांधकामे—**

१) आपल्या उपयोगासाठी बाजार समितीने खरेदी केलेल्या अगर भाड्याने घेतलेल्या जमिनींच्या हक्कपत्रांची किंवा भाडेपट्ट्यांची काळजीपूर्वक तपासणी करा.

२) जेव्हा इमारती आणि अन्य बांधकामे कंत्राटी पद्धतीने बांधतात तेव्हा ती कंत्राटाच्या मर्यादेत आहेत काय हे पहा.

३) खात्या मार्फत बांधकामे करण्यात येतात तेव्हां पहा–

(अ) भांडवली आणि महसुली स्वरुपाच्या बाबतीत खर्चाची विभागणी योग्य रीतीने झाली आहे काय ?

(ब) अर्हताप्राप्त स्थापत्य विशारद आणि अभियंते यांची मूल्य निर्धारण प्रमाणपत्रे मिळविली आहेत काय ?

(क) मोजणी पुस्तके आणि कामाच्या नोंदवह्या ठेवल्या आहेत काय ?

४) निविदा (टेंडर्स) आणि भावदर पत्रके मागवून नागरी बांधकामे केली आहेत काय ?

५) नकाशे आणि अंदाजपत्रके सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूर करून घेतली आहेत काय ?

६) कंत्राटदारांकडून करारनामे व इसाऱ्याची रक्कम घेतली आहे काय ?

७) मालमत्ता नोंदवही योग्य नमुन्यात ठेवली आहे काय ?

८) अर्हताप्राप्त स्थापत्य विशारद आणि अभियंते यांच्या-कडून सर्व बाबतीत पूर्णता प्रमाणपत्रे मिळविली आहेत काय ?

९) नागरी बांधकामावरील खर्चासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध आहे काय ?

१०) (अ) गेल्या वर्षाअखेर झालेला खर्च, चालू वर्षात झालेला खर्च आणि एकूण खर्च दाखविणारी सर्व बांधकामांची यादी घ्या.

(ब) सर्व नागरी बांधकामांची प्रत्यक्ष रुजवात घ्या.

## १०. बाहेरील कर्जे—

१) बाजार समितीने घेतलेल्या कर्जांची खालीलप्रमाणे माहिती लिहा.

| कर्ज मंजूर करणारे माध्यम | मंजूर रक्कम | प्रयोजन | घेतलेली कमाल रक्कम | परतफेड केलेली रक्कम | अदत्त रक्कम | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

२) परतफेड वक्तशीर आहे काय ?

३) विविध कर्जे देताना घालण्यात आलेल्या शर्तींचे अनुपालन होत आहे काय ? उल्लंघने नमूद करा.

## ११. खर्च—

१) जमा आणि खर्चाची अंदाजपत्रके तयार केली आहेत काय ? ती सक्षम प्राधिकाऱ्याकडे सम्मतीसाठी सादर केली आहेत काय ? ती त्यांच्याकडून सम्मत झाली आहेत काय ?

२) अंदाजपत्रकाच्या मर्यादेहून जर काही अधिक खर्च झाला असेल तर पुनर्विनियोजन पत्रके (रीअॅप्रोप्रिएशन) सक्षम प्राधिकाऱ्याकडे सम्मतीसाठी सादर केली आहेत काय ?

३) खर्चाची पत्रके बाजार समितीच्या सम्मतीसाठी वेळोवेळी ठेवली जातात काय ?

४) बाजार समितीच्या व्यवहाराशी संबंध नसलेल्या खर्चाची नोंद करा.

५) नगरांतर दूरध्वनी नोंदवही ठेवली आहे काय ? खाजगी दूरध्वनीचा आकार वसूल करतात काय ?

६) जेव्हां छपाईकाम देतात किंवा लेखन सामग्री आणि जडसंग्रह (डेडस्टॉक) खरेदी करतात तेव्हां पहा—

(अ) निविदा किंवा भावदर पत्रके मागविली आहेत काय ?

(ब) यासाठी बाजार समितीने निश्चित पद्धत ठरवली आहे काय ?

(क) जडसंग्रह सामान, छपाईमाल आणि लेखन सामग्री यांची आवक दिलेल्या आदेशानुसार आहे यावर योग्य नियंत्रण आहे काय ?

१२. झीज—

१) जडसंग्रह सामान, स्थावर मालमत्ता इत्यादीवर योग्य झीजेची तरतूद केली आहे काय ?

२) ज्या दराने अशी तरतूद केली आहे तो दर द्या.

१३. कर्मचारी वर्ग—

१) कर्मचाऱ्यांची नावे, पदनामे, शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, हल्लीचे वेतन आणि भत्ते, ज्या दिनांकापासून नोकरीत घेतले तो दिनांक, घेतलेले जामीन इत्यादी दर्शविणारी कर्मचाऱ्यांची यादी मिळवून ती लेखा परीक्षा अहवालास जोडा.

२) कर्मचाऱ्यांच्या नेमणुका सक्षम प्राधिकृताकडून यथोचित-रीत्या सम्मत झाल्या आहेत काय ?

३) कर्मचाऱ्यांच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधी उभारला असेल तर लिहा.

(१) सक्षम प्राधिकृताकडून संबंधित नियम सम्मत करून घेतले आहेत काय ?

(२) निधीची रक्कम स्वतंत्रपणे गुंतविली आहे काय ?

(३) स्वतंत्र हिशेब ठेवले आहेत काय ?

**लेखा परीक्षा अधिकाऱ्याची सही व पदनाम**

शा. मु. को.—ऑडि. (जे) क्यूबी ३५८–५,०००–२.७१